**पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या सुधारित धोरणाच्या अनुषंगाने ग्रामस्तरावर सामाजिक लेखा परिक्षण नियंत्रण (Social Audit) समिती गठीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग ,**
**शासन परिपत्रक क्रमांक ग्रापापु-१००२/प्र.क्र. ५७७/पापु-०७**
**मंत्रालय , मुंबई-४०० ०३२, दिनांकः- १९ ऑक्टोबर, २००२.**

**वाचा :** १) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, ग्रापापू-१०९९/प्र.क्र. ३२८/पापु-०७, दिनांक २७ जूलै २०००.
२. शासन निर्णय पापवस्ववि, ग्रापापू-१००१/प्र.क्र. १९०/पापु-०७, दिनांक ३ सप्टेंबर २००१.
३. शासन परिपत्रक , पापुवस्ववि, क्र. ग्रापापू-१००२/प्र.क्र. ५३२/पापु-०७, दिनांक २३ मार्च २००२.

**प्रस्तावना :**

संदर्भिय क्रमांक १ व २ येथील शासन निर्णयान्वये शासनाने मागणी आधारित लोकसहभागातून पाणी पुरवठयाचे सुधारीत धोरण जाहीर केले असून त्याची अंमलबजावणी सुरु झाली आहे. पाणी पुरवठा व स्वच्छता योजनेचे नियोजन, अंमलबजावणी आणि देखभाल व दुरुस्ती ग्रामस्थाच्या हातात सोपविण्यात आलेली आहे. योजनेचा निधीसुध्दा थेट ग्रामपंचायतीला उपलब्ध करुन देण्यात येत असून, त्या निधीचा विनीयोग ग्रामसभेने नियुक्त केलेल्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने करावयाचा आहे. **कंत्राटदारांची नियुक्ती, योजनेसाठी आवश्यक मालाची खरेदी, हिशेब तपासनिसांची नेमणूक , योजनेच्या कामकाजाचे पर्यवेक्षण, लोकवर्गणी जमा करणे, शासनाने उपलब्ध केलेला निधी हाताळणे , त्याचा हिशेब ठेवणे, योजना** पूर्ण झाल्यावर तिची देखभाल व दुरुस्ती करणे इत्यादी सर्व बाबी ग्रामसभेच्या निदेशानुसार ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने करावयाच्या आहेत. ग्राम पणीपुरवठा व स्वच्छता समिती वरील सर्व बाबी योग्य प्रकारे करते की नाही व निधीचा विनीयोग व्यवस्थित होत आहे किंवा नाही. हे पहाण्यासाठी व संनियंत्रण करण्यासाठी ग्रामसभेला ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने सादर केलेल्या हिशेब आणि अहवालावर अवलंबून राहावे लागणार आहे. याशिवाय , स्थानिक निधी लेखा यांनी केलेल्या लेखा परिक्षणाचा अहवाल ग्रामसभेसमोर चर्चिला जाईल. परंतू, हे लेखा परिक्षण नियमितरित्या होईलच अशी **वस्तूस्थिती** नाही. आजही ग्रामपंचायतीचे लेखा परिक्षण वर्ष दोन वर्षाच्या विलंबाने होत आहे. त्यामूळे प्रत्यक्ष काम सुरु असताना ग्रामसभेला आवश्यक माहिती मिळावी या दृष्टिने नियोजन करणे आवश्यक आहे.



५०८

२. शासनाने उपलब्ध करुन द्यावयाच्या एकूण रकमेपैकी ६०% रक्कम उपलब्ध करुन दिल्यानंतर पुढील २५% रकमेचा हप्ता गावाला देण्यापूर्वी जिल्हा परिषदेने झालेल्या खर्चाचे पूर्ण लेखा परिक्षण करावे, अशी तरतूद संदर्भिय क्रमांक ३ येथील **दिनांक २३ मार्च, २००२** च्या शासन परिपत्रकान्वये करण्यात आली आहे. हे नियंत्रणसुध्दा काही अंशी ग्रामसभेला उपयोगात येईल.

३. परंतु, या योजनेमध्ये ग्रामस्थांची १०% लोकवर्गणी व शासनाचा ९० % निधी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या नावे बँकेत उघडण्यात आलेल्या स्वतंत्र खात्यात जमा होणार असल्याने हा निधी योग्य पध्दतीने उपयोगात यावा यासाठी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला दिलेल्या आर्थिक अधिकाराची वेळोवेळी तपासणी करुन या समितीच्या कामकाजावर स्वतंत्रपणे लक्ष ठेवून ग्रामसभेला माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी लाभधारक ग्रामस्थामधुनच अशी यंत्रणा निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

प्रस्तावनेत नमूद केलल्या बाबींचा विचार करुन शासन असे आदेश देत आहे की, ग्रामसभेने ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला दिलेल्या आर्थिक अधिकारांची वेळोवेळी तपासणी करण्यासाठी आणि ग्रामसभेच्या वतीने ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या कामकाजावर स्वतंत्रपणे लक्ष ठेवून ग्रामसभेला माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायती अंतर्गत येणा-या पाणी पुरवठा योजनेच्या लाभधारक ग्रामस्थामधून खालीलप्रमाणे **सामाजिक लेखा परिक्षण नियंत्रण समिती** गठित करण्यात यावी :-

१) प्रत्येक वर्षी दिनांक **२६ जानेवारी** रोजी होणा-या ग्रामसभेत सामाजिक लेखा परिक्षण नियंत्रण समिती गठित करावी . काही अपरिहार्य कारणास्तव दिनांक २६ जानेवारी रोजी ग्रामसभेची बैठक होऊ शकली नाही तर, त्यांनंतर लगेचच होणा-या ग्रामसभेत या समितीचे गठण निश्चितपणे करण्यात यावे.

२) या समितीच्या **सदस्यांची संख्या ९ पेक्षा** जास्त नसावी.

३) या समितीमध्ये **किमान १/३ महिला** असाव्यात .

४) ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमध्ये **अंतर्भूत नसलेले ग्रामपंचायतीचे दोन सदस्य** या समितीवर नियुक्त करावेत. परंतू, अशा प्रकारे नियुक्त करावयाच्या सदस्यांची शैक्षणिक अर्हता किमान एस एस.सी. असावी. त्यांना हिशेबांची व लेखा परिक्षणाची जाण असल्यास , ती अतीरिक्त अर्हता समजून अशा सदस्यांच्या नियुक्तिला प्राधान्य देण्यात यावे.

५) गावातील महिला मंडळांमधील **ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीवर नसलेल्या एक महिला सदस्याची** या समितीवर नियुक्ती करावी, परंतू, अशा प्रकारे नियुक्त करावयाच्या महिला सदस्याची



५९०

शैक्षणिक अर्हता किमान **एस.एस.सी.** असावी. तिला हिशेबाची व लेखा परिक्षणाची जाण असल्यास ती अतिरिक्त अर्हता समजून अशा महिला सदस्यांच्या नियुक्तीला प्राधान्य देण्यात यावे.

६) गावात **प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालये, आय. टी. आय.** इ, शैक्षणिक संस्था असल्यास, अशा संस्थेतील असे शिक्षक/ प्राध्यापक/प्रतिनिधी की ज्यांना हिशेबाचे व लेखा परिक्षणाचे ज्ञान आहे अशा कमाल **२ प्रतिनिधींची** नियुक्ती या समितीवर करावी.

७) गावातील अथवा त्या परिसरातील अशी सेवाभावी संस्था की जी योजनेच्या **कुठल्याही कामासाठी नेमण्यात आलेली नाही**, अशा सेवाभावी संस्थेच्या ज्या प्रतिनिधीला हिशेबाचे व लेखा विषयक बार्बीचे ज्ञान आहे अशा एका प्रतिनिधीची नियुक्ती या समितीवर करावी.

८) गावातील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी ज्यांना हिशेबाचे व लेखा परिक्षणाचे ज्ञान आहे अशा एका सेवानिवृत्त अधिका-याची /कर्मचा-याची नियुक्ती या समितीवर करावी.

९) या समितीवर सदस्यांची नियुक्ती करताना गावातील युवक मंडळ /राष्ट्रीय साक्षरता अभियानाचा किमान ग्रॅज्युएट असलेला प्रतिनिधी व बी. कॉम . असलेल्यांना प्राधान्य देण्यात यावे.

२. वरील प्रमाणे निवडण्यात आलेल्या **सामाजिक लेखा परिक्षण नियंत्रण समितीने** प्रत्येक सभेच्या वेळी आपल्यामधून अध्यक्ष निवडावा व आपले कामकाज स्वनियत्रित करावे.

३. समितीने सादर केलेला कोणताही अहवाल ग्रामसभेने पाहून मान्य करताना तो किमान २/३ सदस्यांची सहमतीने मान्य करावा. या समितीच्या लेखा पीरक्षण अहवालावर चर्चा करण्यासाठी बोलाविलेली ग्रामसभा जर, सरंपच, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीवर नसतील तर त्यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात यावी, जर , संरपंच, ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीवर असतील, तर सामाजिक लेखा परिक्षण नियंत्रण समितीच्या कोणत्याही एका सदस्याला ग्रामसभेत सामाजिक लखा परिक्षण चर्चेच्या वेळी त्या विषयापुरते अध्यक्षस्थान देण्यात यावे.

४. सामाजिक लेखा परिक्षण नियंत्रण समितीने सादर केलेल्या अहवालावर ग्रामसभेत चर्चा करण्यासाठी जे मूद्दे ही समिती सादर करेल. त्याची प्रत ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला ग्रामसभेच्या किमान १० दिवस आधी उपलब्ध करुन देण्यात यावी, जेणेकरुन त्यावर ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती आपले उत्तर ग्रामसभेत देऊ शकेल.

५. गावातील इतर लाभधारकांनी या अहवालाची प्रत पाहण्यास मागितल्यास, ती दाखविण्यात यावी. त्याची प्रत ग्रामसभेने ठरविलेले शुल्क देऊन कोणत्याही लाभधारकांस उपलब्ध करुन घेता येईल.



४९९

६.  या अहवालाची प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, योजनेसाठी नेमलेले प्रकल्प व्यवस्थापक, जिल्हा परिषदेने नेमलेले तांत्रिक पर्यवेक्षक, महिला मंडळ इत्यादी सर्व संबंधितांना आवश्यकतेनूसार उपलब्ध करुन देण्यात यावी.

७.  या अहवालाची माहिती ग्रामसभेच्या बैठकीपूर्वी किमान ७ दिवस ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डावर लावण्यात यावी.

८.  हा शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(सुधीर ठाकरे )**
**उप सचिव , महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

मा. राज्यपालांचे प्रधान सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. मंत्री (सर्व ) यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री (सर्व ) यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव , महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
अध्यक्ष , जिल्हा परिषद (सर्व),
सर्व विभागीय आयुक्त,
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
संचालक ,भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा , पूणे,
जिल्हाधिकारी सर्व
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व,
जिल्हा परिषदेचे मूख्य लेखा व वित्त अधिकारी (सर्व)
प्रादेशिक मूख्य अभियंता , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
प्रादेशिक उप संचालक , भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व),
जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधीक्षक अभियंता , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व),
कार्यकारी अभियता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व ),
कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग , जिल्हा परिषद (सर्व),
कार्यकारी अभियंता , लघु पाटबंधारे , जिल्हा परिषद (सर्व),
शिक्षण अधिकारी (प्राथमिक , जिल्हा परिषद (सर्व),
महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
उपअभियंता , ग्रामीण पाणीपुरवठा उप विभाग , जिल्हा परिषद, (सर्व),

जिल्हा वरीष्ठ भूवैज्ञानिक , भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, (सर्व),
तहसिलदार (सर्व),
गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व),
सरपंच , ग्रामपंचायती (सर्व),
महालेखापाल (लेखा परिक्षा ),महाराष्ट्र१, मुंबई,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १, मुबंई.
महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र २, नागपूर,
महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता ), महाराष्ट्र २, नागपूर
मुख्य लेखा परिक्षक , स्थानिक , निधी लेखा, नवी मुंबई,
उप मुख्य लेखा परिक्षक , स्थानिक निधी लेखा , नाशिक , पुणे , औरंगाबाद , अमरावती व नागपूर.
नियोजन विभाग , मंत्रालय,मुंबई,
वित्त विभाग, मंत्रालय , मुंबई,
ग्रामविकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालयातील सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने ,
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७.



५९१